नमुना अ
(नियम ३ पहा)

महाराष्ट्र जमीन महसूल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीयेतर व्यक्तींकडे भोगाधिकार हस्तांतरित करणे) नियम १९७५ याच्या नियम ३ अन्वये द्यावयाची जाहीर नोटीस

ज्याअर्थी, जिल्हाधिकारी जळगांव यांच्याकडे, सोबत जोडलेल्या अनुसूचिमध्ये नमूद केलेल्या व सर्व श्री १) संजय रामदास ठाकरे व २) अरुण रामदास ठाकरे, दोघे प्लॉट नंबर १५, गजानन हौसींग सोसायटी, चर्चजवळ, जळगांव, ता.जळगांव, जि. जळगांव. यांच्या मालकीच्या जमिनीच्या भोगाधिकार विक्रीद्वारे घेण्यासाठी अर्ज केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, अर्जदाराने उक्त जमिनींच्या बाबतीत मोबदल्याच्या रूपाने रक्कम रू. ४०,००,०००/- अक्षरी रूपये चाळीस लाख मात्र एवढी रक्कम सर्वश्री १) संजय रामदास ठाकरे व २) अरुण रामदास ठाकरे यांना देऊ केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, प्र.डांगरी यागावामध्ये अथवा त्यापासून पांच किलोमीटरच्या परिसरात राहणारी जर एखादी जनजातीय व्यक्ती मालकाकडून भोगाधिकार स्वीकारण्यास तयार असेल तर कलम ३६ - अ पोट - कलम (१) च्या परंतुकाच्या उपबंधांन्वये तिला अग्रक्रम द्यावयाचा आहे.

त्याअर्थी, आता, ज्या जनजातीय व्यक्ती प्र.डांगरी गांवाच्या रहिवाशी आहेत अथवा त्याच्यापासून पाच किलोमीटरच्या परिसरामध्ये राहत आहेत आणि ज्यांची सर्व श्री. १) संजय रामदास ठाकरे व २) अरुण रामदास ठाकरे यांच्याकडून विक्रीद्वारे भोगाधिकार स्वीकारण्याची आणि त्यासाठी मोबदल्याच्या रूपाने रू. ४०,००,०००/- अक्षरी रू. चाळीस लाख मात्र एवढी रक्कम जमीन मालक व्यक्तींना देण्याची तयारी आहे अशा विक्री करून देण्यासंबंधीचा अर्ज, या नोटीशीच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून १ (एक) महिन्याच्या आत, खाली सही करणा-याकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

अनुसूची

भोगाधिकाराचे वर्णन

| जिल्हा | तालुका | गांव | भू - मापन क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| जळगांव | अमळनेर | प्र.डांगरी | ३४१<br>३४२ |

| पोट हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ हेक्टर : आर | आकार रूपये : पैसे | जनजातीय हस्तांतर कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|
| ५ | ६ | ७ | ८ |
| ३४१/१ | ०.९० | | |
| | पो.ख. ०.२८ | ०३.०६ | श्री. अरुण रामदास ठाकरे |
| | एकुण ०.१८ | | |
| ३४१/२ | १.०८ | ०३.६९ | श्री. संजय रामदास ठाकरे |
| ३४२/१ | १.५४ | | |
| | पो.ख. ०.१७ | ०५.१८ | श्री. अरुण रामदास ठाकरे |
| | एकुण १.७१ | | |
| ३४२/२ | १.५४ | | |
| | पो.ख. ०.१८ | ०५.१९ | श्री. संजय रामदास ठाकरे |
| | एकुण १.७२ | | |

क्र. हस्तांत/कावि/९९३/२०१६
तहसिलदार यांचे कार्यालय,
अमळनेर, दि. १५/०९/२०१६,

तहसिलदार, अमळनेर
जि. जळगांव

तहसिलदार अमळनेर